International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Vol.4 No.4 March - April 2017

# राजर्षी शाहू महाराजांची शैक्षणदृष्टी : ऐतिहासिक व आजची प्रासंगिकता

**प्रा. श्रीकांत विक्रांत सिरसाठे**

इतिहास विभाग प्रमुख

श्री. स. ह. केळकर महाविद्यालय, देवगड जि. सिंधुदुर्ग

**प्रस्तावना:**

राजवाड्यात जन्माला येऊनही तिथल्या ऐश्वर्यात व राजविलासात गुरफटून न पडता महारवाडा व मांगवाडा हे आपले कार्यक्षेत्र करणारा एकच राजा इतिहासाला ठाऊक आहे, तो म्हणजे कोल्हापूर शाहूराजा, राजा असूनही राजर्षी म्हणून ओळखला जाणारा हा अवलिया म्हणजे समाजशास्त्रज्ञांना, मानसशास्त्रज्ञांन व राजकीय विचारवंतांना पडलेले एक निरंतरचे कोडे आहे. महाराष्ट्राची सामाजिक चेहरेपट्टी बदलण्यासाठी जीवाचे रान करणाऱ्या तेजस्वी महापुरुषांची जी प्रभावळ महाराष्ट्राच्या भूमीमध्ये गेल्या शंभर वर्षात आपापल्या प्रभावाने चमकून गेली तिच्यामध्ये शाहूमहाराजांचे स्थान अनन्यसाधारण आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज (१८७४–१९२२) हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील एक दूरदृष्टी असलेले राज्यकर्ते, समाजसुधारक आणि शिक्षणक्रांतीचे अग्रदूत होते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात भारतीय समाज जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीदमन, अज्ञान आणि दारिद्र्याच्या विळख्यात अडकलेला होता. शिक्षण ही केवळ उच्चवर्णीयांची मक्तेदारी बनली होती. अशा परिस्थितीत शाहू महाराजांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानून समतावादी आणि सर्वसमावेशक शिक्षणव्यवस्थेची उभारणी केली.

शाहू महाराजांचे शिक्षणविषयक विचार हे केवळ तात्कालिक सुधारणा करण्यापुरते मर्यादित नव्हते, तर ते दीर्घकालीन सामाजिक परिवर्तनाचा आराखडा होते. “शिक्षणाशिवाय समाजाचा उद्धार नाही” ही त्यांची ठाम भूमिका होती. बहुजन, शूद्र-अतिशूद्र, स्त्रिया आणि वंचित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणल्याशिवाय खऱ्या अर्थाने स्वराज्य आणि सामाजिक न्याय प्रस्थापित होऊ शकत नाही, याची त्यांना स्पष्ट जाणीव होती. अशा परिस्थितीत राजर्षी शाहू महाराजांनी आपला राजदंड लोककल्याणासाठी वापरण्याचे काम केले. दीनदलित उपेक्षित वर्गाचे दुःख जाणून ते सोडवण्यासाठी आयुष्यभर झटत राहिले.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक दृष्टिकोनाचा ऐतिहासिक अभ्यास करणे.

२) राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणांची वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.

३) बहुजन, स्त्रिया व अस्पृश्यांसाठी केलेल्या शैक्षणिक सुधारणांचा आढावा घेणे.

४) शाहू महाराजांच्या समतावादी शिक्षणदृष्टीची आजच्या काळातील प्रासंगिकता तपासणे.

५) महाराष्ट्र व भारतीय समाजपरिवर्तनाशी शाहू महाराजांच्या शिक्षणनीतीचे नाते स्पष्ट करणे.

**संशोधन पद्धती:**

या संशोधनासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करून शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करण्यात आला आहे. चरित्रग्रंथ, सरकारी अहवाल, समकालीन लेखन, तसेच आधुनिक इतिहासकारांचे अभ्यासग्रंथ हे या संशोधनाचे प्रमुख आधार आहेत.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी:**

१८९४ साली शाहू महाराज कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती झाले. त्या काळात कोल्हापूरसह संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षणाची स्थिती अत्यंत दयनीय होती. बहुजन समाज, शेतकरी, कामगार, स्त्रिया आणि अस्पृश्य वर्ग शिक्षणापासून वंचित होते. शिक्षणाचा प्रसार मुख्यतः ब्राह्मण व उच्चवर्णीय समाजापुरताच मर्यादित होता. अस्पृश्यांना शाळांमध्ये प्रवेश नाकारला जात असे आणि स्त्री शिक्षणाकडेही समाजाने संशयाने पाहिले होते.

या सामाजिक वास्तवाची जाणीव ठेवून शाहू महाराजांनी शिक्षणाला आपल्या राज्यकारभाराचे केंद्रबिंदू बनवले. त्यांनी शिक्षणाला सामाजिक न्यायाचे प्रभावी साधन मानले आणि राज्यसत्तेचा वापर करून शिक्षणव्यवस्थेत मूलगामी बदल घडवून आणले.

**शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार:**

शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार हे आधुनिक, प्रयोगशील आणि मानवतावादी होते. शिक्षण म्हणजे केवळ साक्षरता नव्हे, तर व्यक्तीच्या आत्मसन्मानाचा, विवेकबुद्धीचा आणि सामाजिक जाणीवेचा विकास होय, असे त्यांचे मत होते. जात, धर्म, लिंग किंवा आर्थिक स्थिती यांवर आधारित भेदभाव न करता सर्वांना समान शिक्षण मिळाले पाहिजे, ही त्यांची ठाम भूमिका होती. शिक्षणाबद्दल आपले विचार मांडताना शाहूमहाराजांनी म्हटले होते, " शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झालो नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाचो हिंदुस्थानाला अत्यंत आवश्यकता आहे. त्यांच्या मते, बहुजन समाजाच्या मागासलेपणाचे मूळ कारण

शिक्षणाचा अभाव आहे. त्यामुळे शिक्षण सार्वत्रिक आणि सक्तीचे असले पाहिजे. शिक्षणाच्या माध्यमातूनच समाजातील विषमता, अंधश्रद्धा आणि अन्याय दूर होऊ शकतो, असा त्यांचा विश्वास होता.

**शैक्षणिक धोरणे आणि निर्णय:**

**१. सक्तीचे व मोफत शिक्षण**:

१९१७ साली शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात 'सक्तीचे आणि मोफत प्राथमिक शिक्षण' कायदा लागू केला. हा कायदा भारतातील पहिला क्रांतिकारी शैक्षणिक कायदा मानला जातो. या कायद्यानुसार ठरावीक वयाच्या मुलांना शाळेत पाठवणे पालकांना बंधनकारक करण्यात आले. शिक्षण न देणाऱ्या पालकांवर दंडाची तरतूद करण्यात आली.या धोरणामुळे शाळाबाह्य मुलांची संख्या लक्षणीयरीत्या घटली. 'वतनी शिक्षक' नेमून खेड्यापाड्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यात आला. गरीब, शेतकरी आणि कामगार वर्गातील मुलांना शिक्षणाची दारे उघडली गेली. हे सर्व राजर्षी शाहूमहाराज यांनी केले पण आजचे वास्तव काय तर...

१९४७ साली आपला देश स्वतंत्र झाला. १९५० साली आपण सार्वभौम प्रजासत्ताकाची प्रतिष्ठापना केली. ज्या राज्यघटनेप्रमाणे आपण आपला कारभार करीत आहोत, त्या घटनेतील ४५ व्या कलमाप्रमाणे १९६० साली किंवा त्यापूर्वी या देशातील चौदा वर्षे वयापर्यंतच्या सर्व मुलांना आणि मुलीना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याची जिम्मेदारी राज्य सरकारांनी पार पाडायची होती. दुःखाची गोष्ट अशी की, १९६० सालो तर राहू द्याचः परंतु आज २०१७ सालीदेखील ही जबाबदारी आपण पार पाडलेली नाही

**२. अस्पृश्यांसाठी शिक्षण**:

१९११ मध्ये शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठी सर्व प्रकारचे शिक्षण पूर्णपणे मोफत करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा ठेवण्याऐवजी सर्व जातींच्या मुलांना एकत्र शिक्षण देण्याचा आग्रह त्यांनी धरला. यामुळे सामाजिक एकात्मतेला चालना मिळाली.
श्रीपतराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक योजना राबविण्यात आल्या. उच्च शिक्षणासाठीही त्यांना प्रोत्साहन देण्यात आले.

**३. स्त्री शिक्षण**:

स्त्री शिक्षणाबाबत शाहू महाराज अत्यंत आग्रही होते. कोल्हापूर संस्थानात मुलींसाठी स्वतंत्र शाळा, वसतीगृहे सुरू करण्यात आली. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींची फी माफ करण्यात आली. वैद्यकीय व व्यावसायिक शिक्षणासाठी विशेष शिष्यवृत्त्या देण्यात आल्या.

त्या काळात स्त्री शिक्षणाला समाजाचा मोठा विरोध असतानाही शाहू महाराजांनी निर्भीडपणे स्त्री शिक्षणाचा प्रसार केला. त्यांच्या मते, स्त्री शिक्षणाशिवाय समाजाची प्रगती अशक्य आहे.

**४. वसतीगृहे व शिष्यवृत्ती**:

बहुजन, मागास व गरीब विद्यार्थ्यांसाठी शाहू महाराजांनी विविध वसतीगृहे उभारली. महाराजांच्या प्रयत्नांमुळेच कोल्हापूर शहर हे 'वसतिगृहांची जननी' म्हणून आजही ओळखले जात आहे.

शाहूमहाराज जातीभेदाच्या सर्वस्वी विरुद्ध होते. अनेक जातींची मुले आपापली जात गुंडाळून ठेवून एकाच छपराखाली गुण्यागोविंदाने शिक्षण घेताना दिसावीत, हे त्यांचे स्वप्न होते; परंतु एका विशिष्ट परिस्थितीत त्यांना नाइलाजाने जातवार वसतिगृहे काढावी लागली. तथापि, त्यांचे हे स्वप्न त्यांचा शिष्य म्हणवून घेणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटलांनी खरे केले. त्यांनी अठरापगड जातींची मुले एकाच छपराखाली एकत्र आणली. एकाच चुलीवर शिजलेला आणि या मुलांनीच स्वतः केलेला स्वयंपाक हा या वसतिगृहांचा गाभा होता. त्याचबरोबर शिक्षणातील आर्थिक अडथळे दूर करण्यासाठी शिष्यवृत्ती योजना राबविल्या. परदेशात शिक्षण घेणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांनाही अर्थसाहाय्य देण्यात आले.

**५. इतर शैक्षणिक उपक्रम**:

शाहू महाराजांनी व्यावसायिक, तांत्रिक आणि कृषी शिक्षणावरही भर दिला. पाटील शाळा, सत्यशोधक शाळा, संस्कृत शाळा, तसेच इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करण्यात आला. मागास जातींच्या विद्यार्थ्यांना वेद, संस्कृत आणि इंग्रजी शिक्षणात प्रवेश मिळावा यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.

**सामाजिक समतेसाठी शिक्षण:**

शाहू महाराजांच्या मते शिक्षण हे सामाजिक समतेचे सर्वात प्रभावी साधन आहे. शिक्षणाच्या माध्यमातूनच जातीपातीच्या भिंती कोसळू शकतात आणि माणसामाणसातील भेद दूर होऊ शकतो. "बहुजन हिताय, बहुजन सुखाय" हे तत्त्व त्यांनी आपल्या शैक्षणिक धोरणांचा पाया मानले.

**शिक्षणाची फलश्रुती:**

शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणांमुळे कोल्हापूर संस्थानातील शाळा आणि विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली.

| **वर्ष** | **शाळांची संख्या** | **विद्यार्थ्यांची संख्या** |
|---|---|---|
| १९१७–१८ | २७ | १,२९६ |
| १९२१–२२ | ४२० | २२,००७ |

ही आकडेवारी त्यांच्या शिक्षणक्रांतीची व्यापकता स्पष्ट करते.

**शाहू महाराज व भारतीय संविधान:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शाहू महाराजांना सामाजिक न्यायाचे प्रेरणास्थान मानले. भारतीय संविधानातील कलम ४५ (सक्तीचे व मोफत शिक्षण) आणि कलम ४६ (अनुसूचित जाती-जमातींच्या शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी विशेष तरतूदया कलमावरून असे स्पष्ट होते की राजर्षी शाहू महाराजांच्या विचाराचा पगडा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर होता सामाजिक समतेसाठी राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थांनामध्ये जे आरक्षणाचे धोरण राबविले त्याचबरोबर अस्पृश्यांच्या मुलांना, दीन दलितांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम केले तेच काम पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.भारतीय संविधानात विविध कलमात तश्या प्रकारची तरतूद करून सामाजिक समतेचा रथ पुढे आणण्याचे काम केले. यांमध्ये शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.

**कालसुसंगतता व आजची प्रासंगिकता:**

आजही सामाजिक विषमता, शैक्षणिक दरी आणि आर्थिक असमानता अस्तित्वात आहे. अशा परिस्थितीत शाहू महाराजांची शैक्षणिक दृष्टी अधिकच महत्त्वाची ठरते. समावेशक, समतावादी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण ही आजच्या भारताची गरज आहे. शाहू महाराजांचे विचार आणि कार्य आजही मार्गदर्शक आहेत.

**उपसंहार:**

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य हे भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील एक सुवर्णपान आहे. त्यांनी शिक्षणाला सामाजिक न्यायाशी जोडून बहुजन समाजाच्या उन्नतीचा मार्ग मोकळा केला. आजच्या काळातही त्यांची शैक्षणिक दृष्टी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे. शिक्षण हेच सामाजिक समतेचे आणि प्रगतीचे सर्वात प्रभावी साधन आहे, हा संदेश शाहू महाराजांनी आपल्या कार्यातून दिला.

**संदर्भ सूची:**

१) Ambedkar, B. R. (1990). *Dr. Babasaheb Ambedkar: Writings and speeches* (Vol. 1). Government of Maharashtra.

२) देशमुख वाय. डी. (2010).महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळ. Orient Blackswan.

३) Gazetteer Department, Government of Maharashtra. (2002). *Kolhapur district gazetteer*. Government Press.

४) खैरमोडे सी.पी. (1982). डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र (खंड. 1). सुगावा प्रकाशन.

५) कीर,धनंजय. (1993).शाहू महाराज : एक सामाजिक क्रांतिकारक. पॉप्युलर प्रकाशन.

६) पवार, जे. एस. (2008).राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य. शिवाजी  विद्यापीठ प्रेस.

७) फुले,ज्योतिराव(1991).सार्वजनिक सत्यधर्म. Maharashtra State Literature and Culture Board.